अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,
एस.आर.ए.बिल्डींग, ए-विंग, दुसरा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-400 051.
फोन व फॅक्स-022 26591586, Email:-ccfmangrove@mahaforest.gov.in/ccfmmumbai@gmail.com

विषय :- कोकण विभागातील वेटलँड संदर्भात
पाणथळ तक्रार निवारण समितीची
बैठकीचे इतिवृत्त.

जा.क्र.उप.व/कांकमुं/सभा/ १७ /२०१७-१८
वांद्रे. दिनांक :- १९/०६/२०१७

प्रति,

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक पर्यावरण विभाग.
६. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबिवली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
७. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची ५ वी बैठक दि. 29/03/2017 रोजी मा. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली, मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे जुने सचिवालय, फोर्ट मुंबई येथील कार्यालय येथे घेण्यात आली. सदर बैठकीचे मंजुर इतिवृत्त माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा ही विनंती.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई

**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची 5 वी मासिक बैठक.**

**दिनांक 29/03/2017**

**स्थळ:- विभागीय आयुक्त कोकण विभाग, जुने सचिवालय, फोर्ट मुंबई.**

विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि. 29/03/2017 रोजी कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची सभा आयोजित करण्यात आलेली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते :-

| अ.क्र. | नाव | कार्यालय | पद |
|---|---|---|---|
| 1 | श्री. प्रभाकर देशमुख | विभागीय आयुक्त, कोकण भवन | विभागीय आयुक्त |
| 2 | श्री. जयरामेगौडा आर. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई | सदस्य सचिव, कोकण पाणथळ तक्रार निवारण समिति तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई. |
| 3 | श्री. महेंद्र कल्याणकर | जिल्हाधिकारी , ठाणे | जिल्हाधिकारी ठाणे |
| 4 | श्री. बन्सी गवळी | जिल्हाधिकारी मुंबई शहर | अपर जिल्हाधिकारी मुंबई शहर |
| 5 | श्री. पी.डी.मलिकनेर | जिल्हाधिकारी रायगड | अपर जिल्हाधिकारी रायगड |
| 6 | श्री. रविंद्र सावळकर | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग | अपर जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग |
| 7 | श्री. सतिश देशमुख | जिल्हाधिकारी पालघर | अपर जिल्हाधिकारी पालघर |
| 8 | श्रीमती. वंदना सुर्यवंशी | जिल्हाधिकारी ठाणे | निवासी उपजिल्हाधिकारी ठाणे |
| 9 | श्री. नितीन महाजन | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर | निवासी उपजिल्हधिकारी |
| 10 | श्री. अशोक कुमार रणखांब | ठाणे महानगरपालिक | अतिरिक्त आयुक्त, ठाणे मनपा. |
| 11 | श्री. दिपक पुजारी | मिरा भाईंदर महानगरपालिका | उप-आयुक्त |
| 12 | डॉ. किशोर गवस | वसई विरार महानगरपालिका | उप-आयुक्त |
| 13 | श्री. धनाजी तोरसकर | कल्याण डोंबिवली महानगरपालिका | उप-आयुक्त |
| 14 | श्री. डी.एस.चाबुकस्वार | नवी मुंबई महानगरपालिका | उप-आयुक्त |
| 15 | श्री. विजय बालमवार | बृहन्मुंबई महानगरपालिका | उप-आयुक्त |
| 16 | श्री. हिरालाल सोनवणे | अपर आयुक्त, विभागीय आयुक्त, कोकण विभाग. | अपर आयुक्त |
| 17 | श्रीमती. अश्विनी सानप | पोलिस आयुक्त मुबई शहर | उपायुक्त मुंबई शहर |
| 18 | श्री. टी. एन.पाटील | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई | सहाय्यक वनसंरक्षक |
| 19 | श्री. किशोर रामदास खैरनार | जिल्हा पोलिस अधिकक्षक, पालघर | पोलिस निरिक्षक |
| 20 | श्री. अनिल टोम्पे | पोलिस अधिक्षक ठाणे (ग्रामीण) | पोलिस निरीक्षक |
| 21 | श्रीमती. मेघना भांडे | पोलिस अधिक्षक रायगड (ग्रामीण) | सहाय्यक पोलिस निरीक्षक |
| 22 | श्री. ए.एन.बाबर | पोलिस अधिक्षक सिंधुदुर्ग | सहाय्यक पोलिस निरीक्षक |
| 23 | श्री. आर.एन.मुंगेकर | पोलिस अधिक्षक, ठाणे शहर | वरीष्ठ पोलीस निरीक्षक |
| 24 | श्री. धीरज रमेश परब | वनशक्ती अशासकीय संस्था | प्रतिनिधी |

विभागीय आयुक्त यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले आणि सभेला सुरुवात केली.

| अ.क्र. | मुद्दा | करावयाची कारवाई | अंमलबजावणी करणारी यंत्रणा. |
|---|---|---|---|
| 1 | समितीच्या 4 थ्या वार्षिक बैठकीतील आढावा. | विभागीय आयुक्त यांनी दिनांक 24/01/2017 रोजी झालेल्या 4 थ्या वार्षिक बैठकीचे इतिवृत्त व त्यावर करावयाची कारवाई याचा आढावा घेतला. मागील बैठकीत चर्चा केलेल्या विषयांवर पुर्वीच चर्चा झाल्याचे सदस्य सचिव यांनी सांगितले. | |
| 2 | कोकण वेटलँड तक्रार निवारण समिती प्रचार व प्रसिद्धि करणे. | मा. विभागीय आयुक्तांनी सर्व जिल्हाधिकारी व सर्व समिती सदस्य यांना कोकण वेटलँड तक्रार निवारण समितीच्या अनुषंगाने माहिती देणेबाबत तसेच सदर समितीच्या कामाची पुरेशी प्रसिद्धी करण्याबाबत सुचना दिल्या. तालुका स्तरावर तहसीलदार व समिती सदस्यांच्या कार्यालयाच्या सुचना फलकावर समितीबाबत माहिती देऊन प्रसिद्ध करावी. समितीचे सदस्य सचिव यांनी या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाबाबत सर्व सदस्यांना अवगत केले. | जिल्हाधिकारी व समिती सदस्य सर्व. |
| 3 | समितीच्या बैठकीत समिती सदस्यांच्या गैरहजेरीबाबत. | कोकण वेटलँड तक्रार निवारण समितीस उपस्थित आलेल्या सदस्यांचा आढावा मा. आयुक्त यांनी घेतला असता काही सदस्य सभेस गैरहजर असल्याचे आढळून आले, त्यांना गैरहजेरीबाबत विचारणा करण्यासाठी सदस्य सचिव यांना सुचना दिल्या. तसेच बऱ्याच समिती सदस्यांनी स्वत: उपस्थित न राहता त्यांचे कार्यालयातील अधिनस्त अधिकाऱ्यांना प्रतिनिधी म्हणून पाठविले होते. सदर समिती ही मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थापित झाली असुन समिती संदर्भात असलेल्या शासन निर्णयात प्रतिनिधी पाठविण्याची तरतुद नाही. त्यामुळे भविष्यात या समितीच्या सभेसाठी कोणीही सदस्य त्यांचा प्रतिनिधी पाठवणार नाही याची दक्षता घेण्याच्या सुचना मा. आयुक्तांनी दिल्या. अपवादात्मक परिस्थितीत समिती सदस्यांना सभेस उपस्थित राहणे शक्य होत नसेल तर त्याची पुर्व कल्पना सभेपुर्वी मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्तांना लेखी द्यावी, त्याबाबत सर्व सदस्यांना लेखी कळविण्याच्या सुचना सदस्य सचिव यांना दिल्या. | सर्व समिती सदस्य, सदस्य सचिव. |
| 4 | तक्रार अर्जाच्या चौकशीबाबत | पाणथळ क्षेत्रांच्या ऱ्हासाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तालुका स्तरावर तहसीलदार यांनी महसुल, वने व पोलिस अधिकाऱ्यांचे तपासणी पथक निर्माण करुन तक्रारींची चौकशी करावी. ज्या विभागाच्या अधिकार कक्षेत असेल त्यांनी आवश्यक ती कारवाई करणे. तक्रार अर्जाची चौकशी करताना संबंधित तक्रार कर्त्यास बोलावून घेऊन चौकशी केल्यास तक्रारीत नमुद केलेले क्षेत्र व तक्रारीत नमुद केलेली वस्तुस्थिती याविषयी संदिग्धता राहणार नाही असे मा. आयुक्त यांनी सांगितले. | जिल्हाधिकारी सर्व. |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | विविध ठिकाणी होणाऱ्या वेटलँडच्या ऱ्हासाबाबत आढावा घेणे. | 1) श्री. अनिकेत सतिश वाडीवकर :-<br>श्री. अनिकेत सतिश वाडीवकर यांची मौजे आगाशी, ता. वसई, जि. पालघर येथील सर्वे नं. 233, हिस्सा नं. 1 अ, या जागेतील पाणथळ क्षेत्रावर अतिक्रमणासंदर्भात तक्रार प्राप्त झालेली आहे. या बाबतीत सदस्य सचिव यांनी दि. 04/03/2017 चे पत्रान्वये जिल्हाधिकारी पालघर व उपायुक्त वसई विरार महानगरपालिका यांचेकडे चौकशीसाठी तक्रार अर्ज पाठविला आहे. वरील संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रार अर्जाची चौकशी लवकरात लवकर करुन त्याप्रमाणे सदस्य सचिवांना अवगत करावे अशा सुचना देण्यात आल्या. | जिल्हाधिकारी पालघर, उपायुक्त वसई विरार महानगरपालिका. |
| | | 2) श्री. विवेकानंद गुप्ता.:-<br>श्री. विवेकानंद यांचा 07/02/2017 च्या तक्रार अर्जानुसार अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर. विवेकानंद गुप्ता यांनी मिठी नदी परिसरात कांदळवनापासुन 50 मीटरचे आत विकासकांनी घनकचरा टाकून बांधकाम केल्याबाबत व मिठी नदीचा नैसर्गिक प्रवाह अडविल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली आहे. याबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व बृहन्मुंबई महानगर पालिका यांनी संयुक्त समितीमार्फत चौकशी करुन संबंधितांवर आवश्यक कारवाई करावी व पुर्तता अहवाल सदस्य सचिव यांचे मार्फत समितीस सादर करावा अशा सुचना देण्यात आल्या. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, आयुक्त बृहन्मुंबई महानगर पालिका. |
| | | 3) धीरज परब :-<br>श्री. धीरज परब यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका, वसई व लोहघ्र येथील पाणथळ क्षेत्रावर अतिक्रमण संदर्भात तक्रार केलेली आहे त्यामध्ये मुख्यत्वे जेसल पार्क घोडबंदर रोड विकसित करणे, मिरा भाईंदर मधील पाणथळ जागांवर बांधकामांना परवानगी देणे, त्यांना नागरी सुविधा पुरविणे, मिरा भाईंदर येथील जेट्टी व अन्य बांधकामांना परवानगी देणे, लोहघर येथे पाणथळ क्षेत्रावर भराव करुन कच्ची व पक्की बांधकामे करणे यांचा समावेश आहे. याबाबत उपायुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका, वसई विरार महानगरपालिका यांनी तक्रार अर्जाबाबत सखोल चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या. | उपायुक्त वसई विरार महानगरपालिका, मिरा भाईंदर महानगरपालिका. |
| | | 4) कुलदीप चौधरी :-<br>श्री. कुलदीप चौधरी यांनी ईमेल द्वारे नायगाव (प) ता. वसई जि. पालघर येथील कांदळवनावर भरणी करुन सुमारे 1 एकर क्षेत्रावरील कांदळवने नष्ट केल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. सदस्य सचिव यांनी जिल्हाधिकारी पालघर, उपायुक्त वसई विरार महानगरपालिका व मिरा भाईंदर महानगरपालिका यांना पाठविले आहे. संबंधितांनी | जिल्हाधिकारी पालघर, उपायुक्त वसई विरार महानगरपालिका पालिका. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सदर तक्रारीची सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सुचना मा. आयुक्तांनी दिल्या. | |
| | | 5) रोहीत जोशी :-<br>श्री. रोहीत जोशी ठाणे यांनी स्वामी समर्थ मठ कोपरी ठाणे (पु) येथे कांदळवनावर भरणी करुन कांदळवन नष्ट केल्याबाबत तक्रार केली आहे. सदरची तक्रार सदस्य सचिव यांनी जिल्हाधिकारी ठाणे व उपायुक्त ठाणे महानगरपालिका यांना दिनांक 03/02/2017 रोजी उचित कार्यवाहीसाठी पाठविले आहे. जिल्हाधिकारी ठाणे व उपायुक्त ठाणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणात चौकशी करुन समितीस अहवाल सादर करण्याच्या सुचना मा. आयुक्तांनी दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे, उपायुक्त ठाणे महानगरपालिका. |
| | | 6) श्री. हरीश पांडे :-<br>श्री. हरीश पांडे, मुक्काम दहिसर (प), मुंबई यांनी मढ मार्वे रोड, मार्वे गाव, ता. बोरिवली येथील कांदळवन बृहन्मुंबई महानगरपालिका व INS हमलाच्या अधिकाऱ्यांनी नष्ट केल्याची तक्रार केली आहे. सदर प्रकरणाची चौकशी झाली असल्याचे व उपविभागीय अधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांनी सांगितले. चौकशी अहवाल लेखी स्वरुपात समितीसमोर सादर करण्याच्या सुचना मा. आयुक्तांनी दिल्या. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर. |
| | | 7) श्री. फ्रान्सिस डिसोजा :-<br>श्री. फ्रान्सिस डिसोजा, अध्यक्ष, हरीत नैसर्गिक वैभव बचाव अभियान यांनी भुईगाव येथील मौजे विभागातील पाणथळ जागेवर अतिक्रमणाबाबत व कांदळवन वाचाविण्याबाबत तक्रार दाखल केली आहे. सदरची तक्रार सदस्य सचिव यांनी जिल्हाधिकारी पालघर, उपायुक्त वसई विरार महानगरपालिका यांना दि. 17/01/2017 च्या पत्राने पाठविले आहे. तक्रारीची सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सुचना मा. आयुक्तांनी दिल्या. | जिल्हाधिकारी पालघर, उपायुक्त वसई विरार महानगरपालिका. |
| | | 8) श्री. अनंत दत्तात्रेय पाटील :-<br>श्री. अनंत दत्तात्रेय पाटील यांनी मौजे भुईगाव, ता. वसई, जि. पालघर येथील पाणथळ जमिनीवर बांधकाम केल्याची तक्रार केली आहे. सदर तक्रार चौकशीसाठी सदस्य सचिवांनी 17/01/2017 रोजी जिल्हाधिकारी पालघर व उपायुक्त वसई विरार महानगरपालिका यांच्याकडे पाठविली आहे. सदर तक्रार अर्जाची चौकशी लवकरात लवकर करुन अहवाल सादर करण्याच्या सुचना मा. आयुक्तांनी दिल्या. | जिल्हाधिकारी पालघर, उपायुक्त वसई विरार महानगरपालिका. |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | कांदळवन संरक्षणाबाबत प्रचार व प्रसिद्धी | जिल्हाधिकारी ठाणे यांनी कांदळवनाबाबत जनजागृती व संवर्धनासाठी आकर्षक असे फलक केल्याचे सांगितले. याच धर्तीवर अन्य जिल्हाधिकारी तसेच महानगरपालिकेने आकर्षक असे फलक तयार करुन लावावेत अशा सुचना मा. आयुक्तांनी दिल्या. | जिल्हाधिकारी सर्व. |

सदर सभेस उपस्थित असणाऱ्या सदस्यांचे आभार मानुन बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

अध्यक्ष,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
विभागीय आयुक्त, कोकण विभाग.